**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश.**

विकास योजना सुधारीत करतांना मुळ हद्द व वाढीव हद्द अशा दोन्ही भागांची एकत्रितरित्या विकास योजना तयार करणेबाबत...

# महाराष्ट्र शासन

## नगर विकास विभाग,

शासन निर्णय क्रमांक : टिपीएस-१८१८/१६४७/प्र.क्र. २५२/१८/नवि-१३
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक १५/१०/२०१८

**पहा :-** शासन निर्णय क्रमांक :-टिपीएस-१८१०/८३/प्र.क्र.२११५/२०१०/नवि-१३, दि.०२.०२.२०१२

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मध्ये (यापुढे उक्त अधिनियम संबोधिले आहे. ) सन २०११ ते २०१५ या कालावधीत काही सुधारणा करणेत आल्या असून त्यानुसार विकास योजना तयार करण्याचा कालावधी निश्चित करणेत आला आहे.

०२. उक्त अधिनियमाच्या कलम ३८ मध्ये विकास योजना सुधारीत करण्याबाबत तरतुदी असून त्यानुसार २० वर्षातुन किमान एकदा विकास योजना सुधारीत करणे अपेक्षित असल्याने शासनाने दि.०२.०२.२०१२ रोजी राज्यातील सर्व नगरपंचायती / नगरपरिषदा/महानगरपालिका/विशेष नियोजन प्राधिकरणे अथवा अन्य नियोजन प्राधिकरण यांनी विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून २० वर्ष पुर्ण होण्यापूर्वी तीन वर्ष अगोदर विकास योजना सुधारीत करणेची प्रक्रिया सुरु करण्यात यावी, असे निदेश उक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वये दिलेले आहेत.

०३. राज्यातील नियोजन प्राधिकरणांच्या हद्दीमध्ये वेळोवेळी वाढ होत असते, अशा हद्दवाढ झालेल्या क्षेत्रापूरती विकास योजना स्वंतत्रपणे तयार करणेत येते. कालांतराने अशा वाढीव हद्द क्षेत्राची मंजुर विकास योजना देखील उक्त अधिनियमातील कलम ३८ मधील तरतुदीनुसार सुधारीत करणे आवश्यक ठरते. यानुसार कार्यवाही करतांना संबंधित नियोजन प्राधिकरणाच्या मुळ हद्द व वाढीव हद्द क्षेत्राच्या विकास योजना मंजूरीच्या तारखेमध्ये व वर्षामध्ये फरक पडलेला असतो. त्यामुळे दोन्ही क्षेत्राच्या मंजूर विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही करतांना १७ वर्षाचा कालावधी पुर्ण होण्याची तारीख व वर्ष वेगवेगळे असते. त्यामुळे अशा मुळ व वाढीव हद्द क्षेत्राच्या विकास योजना सुधारीत करणेची प्रक्रिया देखील त्यानुसार वेगवेगळ्या वेळी सुरु करण्यात येते.

०४. मुळ हद्द व वाढीव हद्द क्षेत्राच्या विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही दोन टप्यात करतांना विकास योजना प्रस्तावांचे नियोजन करतेवेळी बऱ्याच अडचणी येऊ शकतात व ते नियोजन देखील योग्य प्रकारे होऊ शकत नाही. त्यामध्ये मुख्यत्वेकरुन दोन्ही हद्दीतुन जाणाऱ्या रस्त्यांचे नियोजन तसेच विकास योजना प्रस्तांवाचे नियोजन करतांना नियोजन प्राधिकरणाच्या संपुर्ण हद्दीचा एकत्रित विचार होऊन नियोजन करण्यास अडचणी येऊ शकतात.

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32

C:\Users\mantralay\Desktop\URC MIDC\154 निदेश पत्र.docx

०५. सबब, नियोजन प्राधिकरणाचे क्षेत्रात मुळ हद्द व वाढीव हद्द अशा दोन भागात विकास योजना मंजूर असल्यास त्यापैकी कोणत्याही एका क्षेत्राची विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही सुरु करतांना दुसऱ्या क्षेत्राची विकास योजना देखील त्यासोबतच सुधारीत करणेची कार्यवाही झाल्यास, अशी एकत्रितपणे विकास योजना सुधारीत करतांना, नियोजन प्राधिकरणाच्या संपुर्ण क्षेत्राचा विचार होऊन विकास योजना प्रस्तावांचे नियोजन अधिक चांगल्या प्रकारे होऊ शकेल व भविष्यात देखील विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही एकाच टप्पावर आणता येईल, याबाबीचा विचार करुन राज्यातील सर्व नियोजन प्राधिरणांना तसेच विशेष नियोजन प्राधिकरणांना उक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वये खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

## निदेश.

राज्यातील सर्व महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायती/विशेष नियोजन प्राधिकरणे अथवा अन्य नियोजन प्राधिकरणे यांनी त्यांच्या क्षेत्रात जर मुळ हद्द व वाढीव हद्द क्षेत्राच्या अशा दोन भागात विकास योजना मंजूर असतील तर अशा मंजूर विकास योजनांपैकी कोणत्याही एका भागाची विकास योजना मंजूर होऊन अंमलात आल्याच्या दिनांकापासून २० वर्ष पुर्ण होण्यापूर्वी ३ वर्ष अगोदर त्या भागाची विकास योजना सुधारीत करण्याची प्रक्रिया सुरु करतांना त्यावेळी, नियोजन प्राधिकरणाच्या संपुर्ण क्षेत्राचा विचार होऊन विकास योजना प्रस्तावांचे नियोजन अधिक चांगल्याप्रकारे करणे शक्य व्हावे व भविष्यात देखील विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही एकाच टप्पावर होण्याच्या दृष्टीने, जरी दुसऱ्या भागाची विकास योजना मंजूर होऊन अंमलात आल्याच्या दिनांकापासून कितीही कालावधी झालेला असेल तरी देखील अशा नियोजन प्राधिकरणांनी संबंधित दोन्ही भागांच्या विकास योजना सुधारीत करण्याची प्रक्रिया एकत्रितपणे हाती घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानूसार व नावाने.

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

(रा.म.पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत :-**
१) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.

२) मा. राज्यमंत्री, (नगर विकास), यांचे खाजगी सचिव.

३) प्रधान सचिव, नवि-१, यांचे स्वीय सहायक.

४) प्रधान सचिव, नवि-२, यांचे स्वीय सहायक.

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीसाठी :-**
१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
/- सदर निदेशाची प्रत नगर रचना संचालनालयाचे वेबसाईटवर प्रसिध्द करावी व शाखा कार्यालयांना तसेच राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांना व विशेष नियोजन प्राधिकरणांना पाठविण्यात यावी.

२) सह सचिव, तथा संचालक,(नगर रचना), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

३) सह संचालक, नगर रचना, कोकण/पुणे/नाशिक/नागपूर/अमरावती/औरंगाबाद विभाग.

४) अवर सचिव,नवि-११, नवि-३०/कक्ष अधिकारी न.वि-०९,नवि-१२ नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.

५) कक्ष अधिकारी, (न.वि-२९) नगर विकास विभाग,मंत्रालय, मुंबई
/- त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे निदेश या विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत कार्यवाही करणेत यावी.

६) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग,मंत्रालय, मुंबई
/- त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे निदेश या विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावेत.

७) निवड नस्ती.

URBAN DEVELOPMENT DEPTT. ★ MANTRALAYA, MUMBAI-32 ★ सत्यमेव जयते